N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): अमरावती शहर  **P.S.**(ठाणे): फ्रेजरपूरा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0405  **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):07/06/2023 02:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार  **Date From** (दिनांक पासून): 06/06/2023

**Time Period** (कालावधी): पहर 5  **Date To** ( दिनांक पर्यंत): 06/06/2023

**Time From** (वेळेपासून): 14:34 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 15:20 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/06/2023  **Time** (वेळ): 02:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 011

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/06/2023 02:41 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 1 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): महक कोल्ड्रीक्स पानठेला,जुना बायपास रोड अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संजय ओंकार गजाम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हातोंडा ता अंजनगाव सुर्जी,जि अमरावती,अजनगांव,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हातोंडा ता अंजनगाव सुर्जी,जि अमरावती,अजनगांव,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9665615127

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दयानंद राजसिंग डिक्का | | | 1. दत्तवाडी जुनी वस्ती बडनेरा, अमरावती,बडनेरा,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सय्यद अन्सार सय्यद लतीफ | | | 1. चपराशीपुरा ,अमरावती, फ्रेजरपूरा,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु. दराच्या 16 नोटा एकुण 08,000/ रु. | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप क्र.405/2023कलम 7,7(A),12 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम -1988.
फिर्यादी - संजय ओंकार गजान वय 30 वर्ष, व्यवसाय नोकरी कोतवाल, रा. हातोंडा ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती मो. क्र. 9665615127
आरोपी - (1) दयानंद राजसिंग डिक्का, वय34वर्ष, पद सफाई कामगार, नेमणुक शासकिय माध्यामिक आश्रम शाळा, टिटंबा, ता. धारणी जि.अमरावती सध्या नेमणुक सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनिसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समीती कार्यालय अमरावती रा. दत्तवाडी जुनी वस्ती बडनेरा अमरावती (2) सय्यद अन्सार सय्यद लतीफ वय32वर्ष, धंदा पानटपरी चालक रा. चपराशीपुरा अमरावती
घटनास्थळ - महक कोल्ड्रीक्स पानठेला , सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनिसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समीती कार्यालय अमरावती च्या समोर जुना बायपास रोड अमरावती
घटना ता वेळ - दि.06/06/2023चे 14.34.00 वा ते 15.20 वा. दरम्याण
दाखल ता वेळ - दि. 07/06/2023चे 02.41 वा.
लाच मागणी- 10,000/- रुपये , स्विकारलेली लाचेची रक्कम- 08,000/- रुपये
नक्कल लेखी रिपोर्ट -फिर्याद दि.06/06/2023 माझे नाव:- श्री. संजय ओंकार गजाम,वय-30 वर्षे, जात - गोंड , व्यवसाय-नोकरी पद - कोतवाल, रा.हंतोडा तालुका - अंजनगांव सर्जी, जिल्हा- अमरावती. मो. 9665615127 मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर मी माझ्या कुटुंबासोबत राहतो आहे व मी हंतोडा गावच्या कोतवाल पदावर आहे. मी कोतवाल पदावर लागल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. त्यानंतर सदर जातवैधता प्रकरण तहसील कार्यालय अंजनगांव सुर्जी यांनी संपुर्ण कागदपत्रे पडताळणी करीता अनुसुचीत जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती येथे अंदाजे दोन महीन्यापुर्वी पाठविले आहे. दि.23/05/2023 रोजी मी माझ्या जातवैधता प्रमाणपत्राच्या पाठपुरावा करण्याकरीता अमरावती येथील कार्यालयात गेलो असता त्या ठिकाणी येथील कर्मचारी श्री.दयानंद डिक्का याना भेटलो व माझ्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत विचारपुस केली असता कर्मचारी दयानंद डिक्का यांनी मला जात वैधता प्रमाणपत्र मिळवुन देण्यासाठी 10,000/-हजार रुपये पैशाची मागणी केली. मी त्यांना माझ्याकडे येवढे पैसे नाही व पैसे देण्याची माझी परिस्थीती नाही. असे म्हटले. त्यावर कर्मचारी डिक्का यांनी '' पैसे दिल्याशिवाय तुझे काम साहेब करणार नाही, पैसे दे लवकर मी तुझं काम करून देतो'' असे म्हटले. त्यावेळी माझी पैसे देण्याची ईच्छा नसताना सुध्दा नाईलाजास्तव 'फोन पे' ने कर्मचारी श्री. डिक्का यांना त्यांचे मो.नं.8308707456 वर 800 रु.पाठवले व राहीलेले पैसे पगार झाल्यावर जुन महीन्यात देतो असे सांगीतले व त्यानंतर मी तेथून निघुन आलो. तरी जात पडताळणी समिती कार्यालय, अमरावती येथील कर्मचारी दयानंद डिक्का यांच्या विरोधात तक्रार असुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती. कर्मचारी श्री.दयानंद डिक्का यांच्याशी माझे कुठलाही वादविवाद नाही किंवा आर्थिक व्यवहार नाही. तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई व्हावी अशा आपयाची पंचासमक्ष तोंडी तक्रार सांगीतल्याने सदर तक्रार लॅपटॉपवर टंकलीखीत करण्यात आली व त्याची प्रिन्ट काढुन त्यावर पंच क्र.1 श्री.धजेकर यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि मांजरे साहेब यांनी सुध्दा सही केली आहे. त्यानंतर पोनि मांजरे साहेब यांनी महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरण येथुन पंच श्री. प्रविण वसंतराव आष्टणकर, पद - कनिष्ठ लिपीक व श्री. सुनिल शिवलाल राठोड,,पद - कनिष्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच कार्यवाही करीता बोलविले. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या

अनुशंगाने पो.नि.मांजरे साहेब यांनी सांगीतले की, मला आलोसे हे खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कार्यवाही करण्याचे सांगीतले वरुन आलोसे हे कार्यालयात हजर आहेत किंवा नाहीत याबाबत मला खात्री करण्याचे सांगीतले वरुन मी श्री.दयानंद डिक्का यांना फोनकरुन खात्री केले असता, ते कार्यालयात हजर नसून ते बाहेर गावी असल्याने त्यांनी मला उदया दिनांक 06/06/2023 रोजी सकाळी 11.00 वाजेच्या सुमारास भेटण्यास बोलाविले आहे. त्यानंतर पो.नि.मांजरे साहेब आम्ही सर्वानुमते दिनांक 06/06/2023 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. याबाबत सविस्तर पंचनामा पो.नि.मांजरे साहेब यांनी केला. पडताळणी पुर्व पंचनाम्या दरम्यान दिलेल्या सुचनेवरुन आम्ही सर्व दिनांक 06/06/2023 रोजी लाचलुचपत कार्यालयात येथे सकाळी 10.00 वा. हजर झालो. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष मांजरे साहेबांनी मला आलोसे हे कार्यालयात हजर आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगीतले वरुन मी फोनव्दारे माहीती घेतली असता, आलोसे यांनी मला सांगीतले की, मी बाहेर आहे तर तुम्ही 12.00 वा. चे दरम्यान आफीस ला या असे म्हटले, त्यावरुन सापळा पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच दोन्ही पंचाना व मला पडताळणी कार्यवाही बाबत च्या सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर अंदाजे 12.00 वाजेच्या सुमारास माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर चालू करुन पंच क्र.1 श्री.आष्टणकर सह अनुसूचीत जमाती जातपडताळणी कार्यालय, अमरावती येथे रवाना श्री.दयानंद डिक्का यांना भेटण्याकरीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर श्री.दयानंद डिक्का यांना फोन लावला असता, त्यांनी मला जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती च्या गेट समोर भेटण्याकरीता बोलाविले. तेव्हा मी व पंच क्र.1 श्री. आष्टणकर असे माझे गाडीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेट समोर गेलो असता, तेथे श्री.दयानंद डिक्का हे मला भेटले, त्यांनी मला जातपडताळणी प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळून देण्याकरीता तडजोडीअंती 8,000/- रुपये लाचेची मागणी करुन आता किती आहे असे म्हणून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली, त्यावेळी मी त्यांना काहीवेळाने पैसे आणून देतो असे म्हटले, त्यानंतर मी व पंच क्र.1 आष्टाणकर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालया येथे आलो व घडलेली हकीकत आम्ही सर्वासमक्ष पंच क्र.2 यांना सांगीतली. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.दयानंद डिक्का यांनी मला माझे जात वैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळून देण्याकरीता 8,000/-रू लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम लगेच घेवून येण्याचे सांगीतल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन लोकसेवक श्री.डिक्का यांचे विरुध्द लागलीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पो.नि.मांजरे यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगीतले असता मी 8,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 16 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक पो.नि.मांजरे यांनी पंच क्र.1 श्री. आष्टणकर यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री. राठोड यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व मांजरे साहेब यांनी सहया केल्या. त्यानंतर मांजरे साहेब यांच्या सुचनेवरुन स्टाफ वैभव जायले यांनी मी हजर केलेल्या नोटाला अँन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करुन तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम माझे षर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली. व स्टाफ आशिष जांभोळे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र.1 श्री.आष्टणकर असे आलोसे श्री.दयानंद डिक्का यांची भेट घेण्याकरीता अनुसुचित जमाती जातपडताळणी कार्यालय, अमरावती येथे रवाना केले, त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपन सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने अनुसूचित जमाती जातपडताळणी कार्यालय जवळ येवुन कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री.आष्टाणकर असे अनुसूचीत जमाती जातपडताळणी कार्यलयाच्या बाहेर असेलेले मेहक कोल्डड्रिंक्स पानसेंटर जवळ श्री.दयानंद डिक्का याना भेटलो असता, श्री.दयानंद डिक्का यांनी तडजोडीअंती मागीतलेली 8,000/- लाच रक्कम पानठेला चालक सय्यद अंन्सार यांचेकडे देण्यास सांगुन श्री.डिक्का हे कार्यालयाकडे निघुन गेले, तेव्हा मी श्री.डिक्का यांचे सांगनेवरुन 8,000/- लाच रक्कम पानठेला चालक सय्यद अंन्सार यांना दिली त्यावेळी अन्सार यांनी माझे फोनवर श्री.डिक्का यांना पैसे घेतल्याचे सांगीतले, त्यानंतर मी लागलीच लाच रक्कम स्विकारण्याचा नियोजित इषारा केला. त्यावेळी तात्काळ माझे जवळ मांजरे साहेब, पाटील साहेब, पंच क्र.2 श्री.राठोड तसेच सापळा पथकातील सर्व स्टाफ त्याठिकाणी आले व त्यांनी अन्सारी यांना ताब्यात घेतले. तेव्हाच पाटील साहेब व सापळा पथकातील काही स्टाफ यांनी अनुसूचीत जमाती जातपडताळणी कार्यालयात जावून श्री.दयानंद डिक्का यांना ताब्यात घेवून मेहक पानसेंटर या ठिकाणी आणले त्यावेळी मांजरे साहेब यांनी श्री.डिक्का व सय्यद अन्सार यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचा परिचय करुन दिला. तेव्हा आषिश जोभोळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकार्डर काढुन बंद केले व पुढील कार्यवाही करीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अमरावती येथे आलो. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आल्यानंतर मांजरे साहेब यांनी श्री.दयानंद डिक्का यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.दयानंद राजसिंग डिक्का, पद- सफाई कामागार, वय 34 वर्ष, व्यवसाय:- नोकरी, पद - सफाई कामगार, नेमणूक- षासकीय माध्यमिक आश्रम षाळा, टिंटबा, ता.धारणी

जि.अमरावती, सध्या संलग्न - सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, अमरावती वर्ग - 4.रा. ह.मु. आई निवास, प्लाट क्र.8 बी, सावता मैदान, दत्ता वाडी जुनी वस्ती बडनेरा, जि. अमरावती असे सांगितले. त्यानंतर मांजरे साहेब यांनी सय्यद अन्सार यांस त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता त्याने, त्याचे नाव सय्यद अन्सार सय्यद लतीफ, वय 32 वर्श, धंदा - पानठेला चालक, रा. पोलीस चैकीच्या मागे चपराशी पुरा अमरावती असे सांगीतले. त्यावेळी पानठेला चालक सय्यद अन्सार यांनी माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी त्यांचे पॅन्टच्या खिश्यात ठेवलेली लाच रक्कम मांजरे साहेब यांनी पानठेला चालक सय्यद अन्सार यांचेकडुन पंचासमक्ष जप्त केली. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला. तरी मला माझे जात वैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळून देण्याकरीता सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, अमरावती येथील कर्मचारी श्री.दयानंद डिक्का, पद- सफाई कामागार यांनी दिनांक 06/06/2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती 8,000/-रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम श्री.डिक्का यांनी अनुसूचित जात पडताळणी कार्यालयच्या बाहेर असलेले मेहक पानसेंटर चे चालक सय्यद अन्सार सय्यद लतीफ यांचेकडे देण्यास सांगीतले वरुन दिनांक 06/06/2023 रोजी अंदाजे 14.34 वा. ते 15.20 वा.च्या दरम्यान पानठेला चालक सयद अन्सार यांनी पंचासमक्ष लाच रक्कम 8,000/- स्विकारल्याने त्यांचे दोघांविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटापवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढून ती मला वाचायला दिली, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे. समक्ष सही (केतन मांजरे) पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Gorakhnath Ramnath Jadhav(I (Inspector)) / 14801000362GRIM7401S   **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):**   **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb Impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Gorakhnath Ramnat
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 14801000362GRJM740: